*भटक्या जमातीतील लोहार या जातीच्या व्यक्तींना जातीची प्रमाणपत्रे देणेबाबत व <u>त्या प्रमाणपत्राची वैधता तपासणी करणेबाबत</u>*

***महाराष्ट्र शासन***

*सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,*

***शासन परिपत्रक** क्रमांक-सीबीसी २००६/प्र.क्र.१९५/मावक-५*

*मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२*

*दिनांक : २३ जून, २००८*

*वाचा :- १) समक्रमांकाचे दिनांक १५ जून, २००६ चे शासन परिपत्रक.*
*२) समक्रमांकाचे दिनांक २९ मार्च, २००७ चे शुध्दिपत्रक.*

***<u>परिपत्रक</u>** :- संदर्भाधीन दिनांक १५ जून, २००६ च्या शासन परिपत्रकान्वये "लोहार" जातीच्या ज्या विद्यार्थ्यांच्या/उमेदवारांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये "गाडी लोहार, पांचाळ लोहार" अशा नोंदी आहेत, अशा विद्यार्थ्यांच्या/उमेदवारांच्या किंवा त्यांच्या वडीलांच्या स्वत:च्या रक्तनात्यातील व्यक्तींच्या जातीच्या नोंदी ज्या कागदपत्रांमध्ये घेतल्या जातात, त्या कागदपत्रांमध्ये "हिंदू लोहार / लोहार " अशा नोंदी असल्यास, त्यांना "लोहार" म्हणून भटक्या जमातीचे प्रमाणपत्र देण्यास हरकत नासावी. तसेच "लोहार" म्हणुन भटक्या जमातीचे प्रमाणपत्र मिळविलेल्या विद्यार्थ्यांची/उमेदवारांची जात प्रमाणपत्रे तपासणीसाठी संबंधित विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणीकडे तपासण्यासाठी प्राप्त झाल्यानंतर ते तपासतांना वरील सूचना समितीने विचारात घ्याव्यात, अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भाधीन दिनांक २९ मार्च, २००७ च्या शुध्दिपत्रकांन्वये "लोहार" ही प्रमुख जात असून "घिसाडी लोहार / गाडी लोहार" व अन्य पोट जाती "लोहार" या प्रमुख जातीच्या अंतर्गत येतात, त्यांच्यातील भाषिक व प्रादेशिक भेद विविध सामाजिक बदलामुळे झालेले आहेत आणि उपजाती किंवा उपनावे वगळण्याची प्रवृत्ती असल्याने "लोहार" या प्रमुख जातीचाच उल्लेख करण्यात येतो. यावरुन मूळ एकच जात आहे असे दिसते, असे स्पष्टीकरण करण्यात आले आहे.*

*२. वरील प्रमाणे स्पष्टीकरण केल्यानंतरही "लोहार" व तिच्या उप जातींच्या विद्यार्थ्यांना/उमेदवारांना जात प्रमाणपत्र आणि जात प्रमाणपत्र वैधता प्रमाणपत्र मिळविण्यामध्ये अडचणी येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच "लोहार" या प्रमुख जातीचा व तिच्या उप जातींचा शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१४/२००५/प्र.क्र.८२/मावक-५, दिनांक १ मार्च, २००६ अन्वये भटक्या जमातीमध्ये समावेश करण्यात आलेला असल्यामुळे उपरोक्त जातीच्या विद्यार्थ्यांना/उमेदवारांना*

*दिनांक १ मार्च, २००६ रोजीचा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या अथवा पूर्वलक्षी प्रभावाने जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र देण्यात यावीत किंवा कसे, याबाबत काही सक्षम प्राधिकारी आणि विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. सदर संभ्रम दूर करण्यासाठी शासन खालीलप्रमाणे सूचना देत आहेत :-*

*राज्य मागास वर्ग आयोगाच्या १३ व्या अहवालातील शिफारशीनुसार "लोहार","गाडी लोहार", " घिसाडी लोहार", अन्य तत्सम उप जाती एकच असल्याचे स्पष्ट करण्यात येत आहे. त्यामुळे या सर्व जाती पूर्वीपासूनच एकच असल्याचे स्पष्ट होते. "लोहार", आणि तिच्या तत्सम उपजाती यांचा भटक्या जमातीमध्ये समावेश करण्यात आल्यामुळे त्यांच्यामध्ये आता कोणताही फरक राहिलेला नाही. या सर्व जाती पूर्वीपासून एकच असल्याची सामाजिक वस्तुस्थिती विचारात घेऊन त्यानुसार लोहार जातीच्या व पोटजातीच्या पूर्वीच्या विदयार्थ्यांना/उमेदवारांना जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र देण्यास हरकत नाही.*

*सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक २००८०६१०१४२५५८००१ असा आहे.*

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,*

*सही/-*

***(ज. न. राठोड)***

***उप सचिव, महाराष्ट्र शासन***

*प्रति,*

**सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,*
*महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,*
*महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,*
*अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,*
*मुख्य महानगर दंडाधिकारी,*
*सर्व विभागीय आयुक्त,*
*सर्व जिल्हा दंडाधिकारी,*
*सर्व उप विभागीय अधिकरी ( महसूल)*
*तथा उप विभागीय दंडाधिकारी,*
*सर्व तालुका कर्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,*
**प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,*
**प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,*
**प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ - नागपूर,*
**प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - नागपूर,*

**प्रबंधंक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ- औरंगाबाद,*
**प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - औरंगाबाद,*
*संचालक समाजकल्याण/ विजाभज, महाराष्ट्र राज्य, पुणे*
*संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,*
*संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,*
*संचालक, प्राथमिक शिक्षण ,महाराष्ट्र राज्य, पुणे,*
*संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक,*
*संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,*
*सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,*
*सर्व मंत्रालयीन विभाग,*

***त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना हयाबाबतच्या सूचना द्याव्यात.***

*सर्व विभागीय समाजकलयाण अधिकारी/ सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,*
*सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,*
*सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,*
*जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई/ मुंबई उपनगरे,*
*महा संचालक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, मंत्रालय, मुंबई,*
*निवड नस्ती, का- मावक-५*

** पत्राने*